दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS Finolex PHILIPS SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

लातूर वर्ष ४ थे अंक २४० वा मंगळवार दि.१८ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## लातूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सावचा शानदार शुभारंभ लातूरच्या विकासाची गती कायम राखण्यासाठी पक्षाभिनिवेश बाजूला ठेऊन एकत्रित प्रयत्न सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

लातूर / प्रतिनिधी : – लातूरच्या विकासाची गती कायम राखण्या सोबतच या जिल्हयातील सांस्कृतिक, शिक्षण, क्रीडा यासह इतर क्षेत्रातील अनुकरणीय वारसा जपण्यासाठी पक्षाभिनीवेश बाजूला ठेऊन सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही राज्याचे सहकार मंत्री, ना. बाबासाहेब पाटील यांनी येथील पीव्हीआर थियटरमध्ये आयोजित आतंरराष्ट्रीश चित्रपट महोत्सव शुभारंभनिमीत्त बोलतांना केले. विलासराव देशमुख फाऊंडेशन, पुणे फिल्म फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे आयोजित तिसऱ्या लातूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा शुभारंभ शुक्रवार दि. १५ मार्च रोजी सायंकाळी, मोठ्या उत्साहाच्या वातावरणात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, सुप्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल, माजी मंत्री आमदार संजयज बनसोडे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, मनपा आयुक्त बाबासाहेबजी मनोहरे, कृउबा सभापती जगदीशजी बावणे, चित्रपट समिक्षक समर नखाते, पूणे फेस्टिव्हलचे विशाल शिंदे, अदिती अंकलकोटकर, तंत्रज्ञ सौरंभ सांगवडेकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. त्यानंतर राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेबजी पाटील यांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन शुभारंभाचा चित्रपट पाहीला. या प्रसंगी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला शुभेच्छा देतांना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख व इतर मान्यवर नेत्यांनी लातूर जिल्हयाला कायम प्रगतीपथावर ठेवले आहे. माजी मंत्री अमित विलासराव देशमुख त्यांना मिळालेला वारसा समर्थपणे पूढे चालवत आहेत. जे जे नव ते ते लातूरला हव या भुमिकेतून कायमपणाने विविध योजना व विविध उपक्रम राबवत असतात. त्यांच्या त्या सर्व प्रयत्नांना पक्षअभिनीवेश बाजूला ठेऊन राज्याचा मंत्री म्हणून आपला कायम पाठींबा आणि सहकार्य राहील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली. लोकशाही व्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी विरोधी पक्षाची






भुमिका समर्थपणे निभाऊ आमदार अमित विलासराव देशमुख सर्वांनीच सत्ताधारी पक्षात गेले तर लोकशाही व्यवस्थेचा समतोल बिघडेल आणि ती बाब आपल्या कोणालाच परवडणारी राहणार नाही. त्यामुळे आम्ही आहोत तिथेच राहून विरोधी पक्षाची भूमिका समर्थपणे सांभाळणार आहोत. तुमच्यासारख्या अनेकांना तिकडे सत्ताधाऱ्यांच्या परड्यात गर्दी झाल्यासारखे वाटले तर आमच्याकडे या त्यामुळे कदाचित आपले पारडे जड होईल आणि तेच सत्ताधारी बनेल. या बदलासाठी धीर धरण्याची आमची तयारी आहे असे स्पष्ट प्रतिपादन मांजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या कार्यक्रमात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार विक्रम काळे यांच्या राजकीय ऑफरवर बोलताना केले. यावेळी बोलतांना मांजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, जे जे नवं ते ते लातूरला हवं ही भूमिका माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची नेहमीच राहिली, त्यांचा तो वारसा जपण्याचाच एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे लातूरला आयोजन करण्यात आले आहे, जगात नेमके नवीन काय घडते आहे, याचे ज्ञान लातूर व परिसरातील जनतेला व्हावे त्यातून त्यांना अनेक नवीन गोष्टी शिकता याव्यात ही या आयोजना पाठीमागची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र ही देशाची सांस्कृतिक राजधानी आहे, ही संस्कृती जपण्याची आणि पुढे चालवण्याचा या चित्रपट महोत्सव आयोजना पाठीमागचा आणखीन एक उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पूढे बोलतांना ते म्हणाले, दुष्काळ आणि कोरोना महामारीमुळे लातूर फेस्टिवलच्या आयोजनात खंड पडला आहे. आगामी काळात हा फेस्टिवल पुन्हा आयोजित करण्याचा प्रयत्न राहील अशी ग्वाही यावेळी बोलताना दिली. शेवटी चार दिवस चालणाऱ्या या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखवण्यात येणाऱ्या चित्रपटांनां कलारसिक मंडळींनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार संजय बनसोडे म्हणाले की, महाविकास आघाडी सरकारच्या काळात माजी मंत्री अमित देशमुख यांनी सांस्कृतिक कार्यमंत्री असताना सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून कलाप्रेमी सिने रसिकांसाठी ही अत्यंत आनंदाची बाब असून अभिनयाची कला जोपासली जावी, हा यामागील मुख्य उद्देश असून लातूर फेस्टिव्हल लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख यांनी सुरू केला, पण सध्या त्यात खंड पडला आहे, तो लातूर फेस्टिव्हल पुन्हा सुरू करावा अशी विनंती करीत या फिल्म फेस्टिव्हलचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यानी केले. यावेळी प्रस्ताविकपर भाषणात बोलताना, पुणे फिल्म फेस्टिव्हलचे संकल्पक व ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी सर्वप्रथम उपस्थित मान्यवर तसेच सिनेरसिकांचे शब्दसुमनाने स्वागत करून फिल्म फेस्टिव्हल संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली. पुढे बोलताना ते म्हणाले, माजी मुख्यमंत्री लोकनेते विलासराव देशमुख आणि माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणन केलेल्या उल्लेखनीय कार्याचा त्यांनी तेथे आवर्जून उल्लेख केला. यावेळी बोलताना आमदर विक्रम काळे म्हणाले की, या फेस्टिव्हलच्या माध्यमातून पर्वणी सिनेरसिकांना मुंबई नंतर लातुरात उपलब्ध करून देण्यात आली आहे याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

## शिक्षकाच्या आत्महत्या प्रकरणी पोलिसामार्फत गुन्हा दाखल करण्यात यावा-दत्तात्रय(पिंटू) ठोंबरे

केज/प्रतिनिधी शिक्षकाच्या आत्महत्या प्रकरणी पोलिसा मार्फत गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे केज पंचायत समितीचे माजी सदस्य दत्तात्रय(पिंटू) ठोंबरे यांनी केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, कृष्णा अर्बन बँक, बीड या ठिकाणी संस्थाचालक पिता पुत्राच्या जाचाला कंटाळून झालेली आत्महत्या ही माझ्या कार्यक्षेत्रातील मयत शिक्षक धनंजय अभिमान नागरगोजे रा. देवगाव ता. केज येथील असून संबंधित संस्थाचालक रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठान,१८ वर्षापासून पगार मिळत नसल्याने अध्यक्ष विक्रम बाबुराव मुंडे, उपाध्यक्ष विजयकांत विक्रम मुंडे, सचिव अतुल विक्रम मुंडे यांच्याकडून छळ झाल्याची व आत्महत्या करण्यास सुचवल्याच्या दबावापोटी आत्महत्या करत असल्याची मैदानी फेसबुक पोस्ट करून त्या सर्व आरोपींना सजा शिक्षा होण्याच्या उद्देशाने स्वतः खंबीर पुरावा पोलिसापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था करून देखील पोलीस निरीक्षक, शिवाजीनगर पोलीस ठाणे आकस्मित मृत्यू कसे काय जाहीर करू शकतात. वरील मुंडे पिता पुत्रांची माझ्या कार्यक्षेत्रात मोठी दहशत गुंडगिरी आहे. त्यांच्यावर यापूर्वी देखील गु.र.नं.३२३,३२४,३४१,५०४, ५०६,४२०,३५३,३/२५ आर्म क्ट सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. तसेच या पिता पुत्राकडे (१)४८/९६,(२)४९/९६ असे दोन परवानाधारक रिव्हॉल्वर असून यांची फार मोठी दहशत असल्याने व सत्ता पक्षाचे कार्यकर्ते असल्याने त्यांच्या विरोधात पुढे येण्याची कोणी हिंमत दाखवत नाही त्यांचा प्रचंड दबाव आहे. त्यामुळे पोलीस निरीक्षक साहेब आपण वरील धनंजय नागरगोजे यांच्या फेसबुक पोस्ट त्यामध्ये दर्शवण्यात आल्याप्रमाणे पुरावा ग्राह्य धरून तात्काळ पोलीस कार्यवाही व मृत्यूस कारणीभूत तसेच छळ, दबाव, दहशतीच्या संबंधिता विरुद्ध फिर्याद दर्ज करण्यात यावी व वरील प्रमाणे गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्यात यावा.



तसे न झाल्यास मी आज रोजी पत्र दिले पासून आपल्या पोलीस ठाण्यासमोर तात्काळ अन्नत्याग उपोषण करणार आहे. त्याची सर्वस्वी जिम्मेदारी आपल्यावर राहील असे दिनांक १६ मार्च २०२५ रोजी माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय(पिंटू) येडू ठोंबरे यांनी पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, बीड यांना दिलेल्या लेखी निवदनात म्हटले आहे. या लेखी निवेदनाच्या प्रती पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे शिवाजीनगर,बीड, बजरंग सोनवणे, खासदार बीड, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, पोलीस अधीक्षक, पोलीस मुख्यालय बीड, आमदार सुरेश आण्णा धस यांना दिलेल्या आहेत.

## औरंगजेब याची कबर काढू नका- वीर योद्धा संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत रांजणकर


लातूर :-:सध्या राज्यात छत्रपती संभाजी नगर येथे असलेल्या औरंगजेब यांची कबर वरुन राजकारण तापत असताना लातूर येथे वीर योद्धा संघटनेच्या वतीने औरंगजेब यांची कबर काढू नये अशी मागणी दिनांक १७ मार्च रोजी हॉटेल रसिका येथे आयोजित पत्रकार परिषदमध्ये राज्य सरकारला दुपारी दोन वाजता वीर योद्धा संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत रांजणकर यांनी केली आहे.



औरंगजेब यांची कबर न काढता जैसे थे या स्थितीमध्ये ठेवावी व त्याचे उदातीकरण करू नये अशी ही मागणी यावेळी सरकारकडे करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.
औरंगजेब यांची कबर म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आहे. तो इतिहास पुसला गेला नाही पाहिजे. यासाठी सरकारने पावले उचलावीत परकीय आक्रमणांचे येथे अशीच कबर उभारली जाते याचे जिवंत उदाहरण या कबरी सोबत जोडून आहे तर औरंगजेब यांची कबर नष्ट न करता तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास दर्शवावा अशी ही मागणी यावेळी करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेला वीर योद्धा संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत रांजणकर, संतोष यादव, रमेश शिंदे, दयानंद गव्हाणे आदी उपस्थित होते.

## विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुशिलकुमार चिकटे

लातूर :- विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुशीलकुमार चिकटे यांची सर्वानुमते रविवारी निवड करण्यात आली. जयंती समितीच्या कार्यकारिणी निवडीसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे डॉ.अजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी बैठक संपन्न झाली.यावेळी समाजबांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.यावेळी गेल्या वर्षीचा लेखाजोखा जयंतीचे अध्यक्ष मांडला. या बैठकीत अध्यक्षपदी सुशीलकुमार चिकटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून अन्य कार्यकारिणीत सचिव राहुल कांबळे,गोविंद कांबळे,कोषाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, कार्याध्यक्ष.ड. रमक जोगदंड,निखिल





गायकवाड, स्वागताध्यक्ष डॉ.विजय अजनीकर,रामभाऊ कोरडे, संघटक म्हणून विनय जाकते, रणधीर सुरवसे,उपाध्यक्ष ॲड. अभय कांबळे,अमोल शिंदे, सहसचिव विजय चौधरी,विनोद कोल्हे,सहसंघटक विशाल वाहुळे,निलेश बनसोडे, बालाजी कांबळे,सहकोषाध्यक्ष रवी कांबळे,सिद्धार्थ लामतुरे, सांस्कृतिक प्रमुख सचिन गायकवाड,सदस्य बाळासाहेब गायकवाड,गोविंद कांबळे,ऋषी दुवे,तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून डॉ. सितम सोनवणे,डी.उमाकांत, आदींचा समावेश आहे.

## खंड पिठाच्या आदेशाची पायमल्ली..

> सत्यता पडताळणी होताच नियुक्ती देणार
> या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांचेशी संपर्क साधला आसता, पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांच्या फवारणी प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी होणे बाकी आहे. ही पडताळणी पूर्ण होताच पुढील आठवड्यात पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात येणार आसल्याची माहिती त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

केज/प्रतिनिधी बीड जिल्हा परिषदेचे च्या आरोग्य विभागानंतर्गत ५० टक्के आरोग्य सेवक हंगामी फवारणी क्षेत्र पुरुष कर्मचारी यांच्या भरावयाच्या १०४ जागेसाठी जिल्हा परिषदेच्या वतीने वर्तमान पत्रात जाहिरात देणे, परीक्षा घेणे, गुणवत्ता यादी जाहीर करणे, कागद पत्राची पडताळणी करणे अशी प्रक्रिया सप्टेंबर २०२४ अखेर पूर्ण होऊनही पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली नव्हती. त्यामुळे या प्रकरणी औरंगाबाद खंड पिठात सुनावणी होऊन, हे पद आरोग्याशी निगडित आसल्याने तात्काळ कार्यवाही करावी असा आदेश १० दिवसापूर्वी बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना देऊनही १०४ आरोग्य कर्मचाऱ्याच्या नियुक्तीच्या अध्यापही हालचाली सुरु करण्यात आलेल्या नाहीत. पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत अशी मागणी निवड झालेल्या आरोग्य सेवक कर्मचाऱ्या कडुन होत आहे. या भरती प्रक्रियेचा निकाल सहा महिन्यापूर्वी लागूनही आणि औरंगाबाद खंडपिठाणे दि. ७ मार्च २०२५ रोजी बीड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आदेश देऊनही व ग्राम विकास विभागाच्या अवर सचिव सुप्रिया घोटाळे यांनी दि. १२ मार्च २०२५ रोजी अवश्य कारवाई करावी आसे आदेश संबंधितना दिलेले आहेत. तरीही या प्रकरणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी ५० टक्के आरोग्य सेवक कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश दिलेले नाहीत. हे आदेश पात्र कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यात यावेत अशी मागणी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांतुन होत आहे.

> पात्र कर्मचारी मानसिक व आर्थिक विवंचनेत
> बीड जिल्ह्यातून ५० टक्के आरोग्य सेवक कर्मचारी पदासाठी पात्र ठरलेले १०४ आरोग्य कर्मचारी यांनी निवड ७ महिन्यापूर्वी होऊनही त्यांना अद्याप नियुक्तीचे आदेश मिळालेले नाहीत. त्यामुळे हे सर्वजण मानसिक व आर्थिक विवंचणेत सापडले आहेत.

## संपादकीय....

### प्रेमाच्या मोहात, अंधश्रद्धेच्या फेर्यात तरुणाई

ती मला पाहिजेच, काहीही झाले तरी मी प्रेमप्रकरणात यशस्वी झालोच पाहिजे, अशा मोहामुळे प्रेमवेडे अनेक तरुण सध्या भोंदूबाबांच्या मायाजालात अडकत चालले आहेत. तिला पटवण्यासाठी या मंत्राचा जप करा, तिचे नाव लिहून तिचा फोटो झाडाला लटकवा, विशिष्ट वस्त्र किंवा केस मिळवून पूजा करा असे अनेक विचित्र अघोरी उपाय भोंदूबाबांकडून तरुणाईला सुचवले जात आहेत. हे सारे चित्र दुसर्या कोणत्या जिल्ह्यातील नाही, तर पुरोगामी समजल्या जाणार्या आपल्या कोल्हापूर जिल्ह्यातील आहे. शहरालगतच्या ग्रामीण भागात अशा भोंदू बाबांचा अक्षरशः सुळसुळाट सुरू आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात भोंदू बाबांची पॉवर चांगलीच वाढली आहे. अगदी बैलगाडी, घोडागाडी, श्वान शर्यत जिंकण्यापासून ते प्रेमप्रकरणात यशस्वी होण्यापर्यंतच्या सर्व गोष्टींवर अघोरी उपाय या बाबांकडून सुचवले जात आहेत.

**रुमाल टाकताच बैल जाग्यावर बसण्याचा दावा**

सध्या वाड्या-वस्त्यांपासून ते अगदी शहरांपर्यंत बैलगाडा, घोडागाडी, श्वान आणि म्हशीच्या शर्यतींची क्रेझ आहे; मात्र या शर्यतींनादेखील भोंदूबाबांनी अंधश्रद्धेचे ग्रहण लावले आहे. रुमाल टाकताच बैल जाग्यावर बसणारच, असे चॅलेंज या भोंदूंकडून दिले जाते. त्यामुळे असल्या भोंदूबाबांना चार-पाचशे रुपये द्यायचे, बैलावरून लिंबू ओवाळून टाकायचा, शर्यतीच्या मैदानावर प्रतिस्पर्धी बैलाच्या नावाने नारळ फोडणे, अंगारा फुंकणे, लिंबू ओवाळून फेकण्यासारखे प्रकार पाहायला मिळत आहेत.

**शर्यतीत फोनवरून वशीकरण मंत्र**

सध्या तर बैलगाडा शर्यत अंधश्रद्धेच्या मगरमिठीत अडकली आहे. आपला बैलच जिंकावा, यासाठी शर्यत सुरू होताच भोंदूबाबाला फोन लावला जातो. प्रतिस्पर्धी बैलाचे नाव सांगितले जाते. आपल्या पुढे किती गाड्या आहेत, आपल्या मागे किती गाड्या आहेत ही सर्व माहिती दिली जाते. यानंतर बाबाकडून सूचना दिल्या जातात.

**भोंदू पॉवरमुळे स्मशानभूमीवर सीसीटीव्ही**

शहराजवळच्या गावांमध्ये भोंदूबाबांची पॉवर सध्या चांगलीच वाढली आहे. अघोरी कृत्यांमुळे गावकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. ठरावीक दिवशी तर इतकी गर्दी होते की, गावात पाय ठेवायला जागा नसते. स्मशानभूमीत अघोरी कृत्य होत असल्याने हणमंतवाडी ग्रामपंचायतीला स्मशानभूमीत अक्षरशः सीसीटीव्ही बसविण्याची वेळ आली आहे.

# शहीद पत्नी ते वीर नारी; शूर महिलांचा प्रेरणादायी प्रवास

शहिदांच्या पत्नींना 'वीर नारी' असे संबोधले जाते. सैनिक कल्याण विभागाच्या नोंदीनुसार अशा वीर पत्नींची संख्या भारतात २६ हजारांपेक्षा अधिक आहे. वीरगती प्राप्त झालेल्या सेनानींच्या पश्चात त्यांच्या कुटुंबियांचे आयुष्य सुकर व्हावे म्हणून सरकारतर्फे त्यांच्या विधवा पत्नीला म्हणजेच वीर नारीला कौटुंबिक निवृत्तीवेतनासह अनेक सेवा सुविधा व सवलती दिल्या जातात. काही जणींना अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळते. पण शहीद झालेल्यांचे देशसेवेचे कार्य अपूर्णच राहिल्याची खंत काही संवेदनशील वीर नारींना सतत जाणवत राहते आणि ते कार्य आपण पूर्ण करावे असे त्यांना वाटते. रवींदरजीत रंधावा आणि सबिना सिंग या दोन तरुण वीर नारी माजी लष्करप्रमुख जनरल व्ही. पी. मलिक यांच्या पत्नी रंजना मलिक यांना दिल्ली येथील लष्करातील कर्मचारी/ अधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या 'आर्मी वाईव्ज वेल्फेअर असोसिएशन' च्या ऑफिसमध्ये भेटायला गेल्या. पतीचे देशसेवेचे कार्य पूर्ण करण्यासाठी संरक्षण दलात कार्य करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली व त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. युद्धात शत्रूंशी लढताना, दहशतवाद्यांचा बिमोड करत असताना अथवा अपघातात ज्यांना अकाली वीरगती प्राप्त होते अशा शहीदांच्या वीर नारींची संख्या वाढत आहे. वयाची अट आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यामुळे अनेक वीर नारींना संरक्षण दलात जाता येत नाही. तेव्हा इच्छुक वीर नारींना विशेषतः तरुणींना ही संधी उपलब्ध करून द्यावी असे रंजना मलिक यांनी आपले पती जनरल व्ही. पी. मलिक यांना सुचवले. जनरल मलिक यांनी संरक्षण मंत्रालयाला विनंती करून अशी परवानगी मिळवली. या परवानगी बरोबरच केंद्रीय कर्मचारी निवड आयोगाच्या मुलाखतीपर्यंत पोहचण्यासाठी आवश्यक असणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या एकत्रित संरक्षण सेवा परीक्षेत सूट मिळवून तसेच वयोमर्यादा काही प्रमाणात शिथील करून घेण्यात आली. या नवीन तरतुदींमुळे अनेक वीर नारींना अभिमानाने भारतीय संरक्षण दलात पदार्पण करून देशाची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली. ही संधी प्रथम लष्करात व वायू दलात देण्यास सुरुवात झाली आणि त्यानंतर नौदलात. आत्तापर्यंत जवळजवळ ५० वीर नारी संरक्षण दलात रूजू झाल्या आहेत. अशी संधी देणारे भारतीय संरक्षण क्षेत्र हे जगातील पहिले आहे. संरक्षण दलात पदार्पण करण्याची संधी मिळताच इच्छुक वीर नारींनी पती निधनाचे दु:ख बाजूला सारून, तसेच अडचणींना न जुमानता मोठ्या जिद्दीने अभ्यास व मेहनत करून भारतीय संरक्षण दलातील प्रवेशासाठी आवश्यक निवड समितीच्या परीक्षा व मुलाखती दिल्या. त्या उत्तीर्ण झाल्या आणि त्यानंतर कमी कालावधीच्या कार्यासाठीच्या आयोगाचे (शॉर्ट सर्व्हिस कमिशन) ११ महिन्यांचे अतिशय खडतर प्रशिक्षण चेन्नई येथील आर्मी ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमी मध्ये यशस्वीपणे पूर्ण करून लेफ्टनंट म्हणजे संरक्षण दलातील अधिकृत अधिकारी म्हणून रूजू झाल्या. रविंदर जीत रंधावा या मेजर सुखविंदर जीत सिंग रंधावा यांची पत्नी. सुखविंदर यांना जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यात दहशतवाद्यांशी मुकाबला करत असताना वीरगती प्राप्त झाली. सबिना सिंग यांचे पती हेलिकॉप्टरचे पायलट होते. ते हेलिकॉप्टरच्या एका दुर्घटनेत मृत्युमुखी पडले. रवींदर जीत व सबिना सिंग या दोघींनी संरक्षण दलात दाखल होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुलाखतीत देऊन चेन्नई येथील ११ महिन्यांचे प्रशिक्षण सप्टेंबर १९९८ मध्ये यशस्वीपणे पूर्ण केले आणि लेफ्टनंट पद मिळवले. एप्रिल १९९८ मध्ये वीरगती प्राप्त झालेले सुखविंदर जीत सिंग रंधावा यांना मिळालेला कीर्ति चक्र पुरस्कार त्यांची पत्नी रविंदर जीत या वीर नारीने चेन्नई येथील आपल्या प्रशिक्षणाच्या गणवेशात स्वीकारला. रविंदर जीत रंधावा आणि सबिना सिंग या दोघी पहिल्या वीर नारी आहेत ज्यांनी पतीच्या मृत्यूनंतर स्वतः भारतीय सैन्यात पदार्पण केले. या दोघींची दुर्दम्य इच्छाशक्ती, निर्धार व धाडस यांपासून स्फूर्ती घेऊन अनेक वीर नारी सैन्यात दाखल झाल्या. अशाच आणखी काही शूर वीर नारी सेनानींबद्दल आपण जाणून घेऊ. स्वाती महाडिक महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील पोगरवाडी नावाच्या एका छोट्याशा गावातील स्वाती महाडिक या अतिशय साध्या कुटुंबातील महिला. भारतीय लष्करात कार्यरत असलेले कर्नल संतोष महाडिक यांच्या त्या पत्नी. पतीने प्रोत्साहन व साथ दिल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून एम. ए. झालेल्या स्वाती यांनी ऑटिझम असलेल्या मुलांसंबंधीचे विशेष प्रशिक्षण घेतले. केंद्रीय विद्यालयामध्ये त्या शिक्षिकेचे काम करत होत्या. कर्नल संतोष महाडिक काश्मीरमधील कुपवाडा येथे लष्कर-ए-तैयबाच्या दहशतवाद्यांना हुसकावून लावण्यासाठी सीमेवरील शोध मोहिमेचे नेतृत्व करत असताना १७ नोव्हेंबर २०15 रोजी त्यांच्या पथकाची दहशतवाद्यांशी चकमक झाली. या पथकाने हाजी नाक्याच्या घनदाट जंगलात त्यांचा पाठलाग केला. तेथे लपलेल्या अतिरेक्यांकडून अनपेक्षित गोळीबार झाला आणि या चकमकीत कर्नल संतोष महाडिक गंभीर जखमी होऊन त्यांना आपले प्राण गमवावे लागले. कर्नल संतोष महाडिक यांच्या अतुलनीय पराक्रमाबद्दल मरणोत्तर 'शौर्यचक्र पुरस्कार' स्वाती महाडिक यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते स्वीकारला. त्याच वेळी स्वाती यांनी सैन्यात भरती होण्याचा निर्धार केला. अवघ्या नऊ महिन्यांत अभ्यास करून स्वाती परीक्षा व मुलाखतींमध्ये उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर चेन्नई येथील ११ महिन्यांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून त्या लष्कराच्या दारूगोळा व हत्यारे बनवणाऱ्या विभागात ९ सप्टेंबर २०१७ रोजी लेफ्टनंट या पदावर रूजू झाल्या. भाग्यश्री पाटील भाग्यश्री पाटील या कर्नल विश्वास कुमार यांच्या पत्नी ज्यांचे २०१८ साली कर्तव्य बजावत हृदयाच्या तीव्र झटक्याने निधन झाले. भाग्यश्री यांना अमेरिकेचा व्यावसायिक वैमानिकांचा परवाना मिळालेला असूनही त्यांनी पतीच्या निधनानंतर एक महिन्याच्या आत भारतीय सैन्यात भरती होण्याचा निर्णय घेतला. आवश्यक त्या परीक्षा, मुलाखती आणि चेन्नई येथील प्रशिक्षण यात यशस्वी होऊन भाग्यश्री यांनी लेफ्टनंट म्हणून ९ मार्च २०१९ रोजी भारतीय संरक्षण दलात पदार्पण केले. गौरी महाडिक कंपनी सेक्रेटरी आणि वकीलीचे शिक्षण घेतलेल्या मुंबईच्या गौरी या भारतीय सैन्यातील मेजर प्रसाद महाडिक यांच्या पत्नी. अरुणाचल प्रदेशातील भारत-चीन सीमारेषेजवळील तवांग येथे कार्यरत असताना ३० डिसेंबर २०१७ रोजी मेजर प्रसाद महाडिक यांच्या बराकीला आग लागली आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. गौरी महाडिक यांनी पती प्रसाद महाडिक यांच्याप्रमाणेच निष्ठेने देशाची सेवा करण्याचा निश्चय करून भारतीय सेनेत भरती होण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यांनी कंपनी सेक्रेटरीची नोकरी सोडली आणि सैन्यात भरती होण्यासाठीच्या परीक्षा व मुलाखतीमध्ये विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झाल्या. चेन्नई येथील प्रशिक्षण पूर्ण करून ७ मार्च २०२० रोजी गौरी महाडिक लेफ्टनंट या पदावर रुजू झाल्या. कणिका राणे कणिका राणे या मेजर कौस्तुभ राणे यांच्या पत्नी. ९ ऑगस्ट २०१८ रोजी जम्मू - काश्मीर येथे बांदीपोरा जिल्ह्यातील नियंत्रण रेषेजवळ घुसखोरी करणाऱ्या अतिरेक्यांना रोखण्यासाठी झालेल्या चकमकीत मेजर कौस्तुभ राणे शहीद झाले. त्यांना मरणोत्तर देण्यात आलेला 'शौर्य पुरस्कार' स्वीकारताना पत्नी कणिका राणे यांनी स्वतः संरक्षण



दलात पदार्पण करण्याचे ठरवले. कणिका या एका बहुराष्ट्रीय कंपनीत प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून कार्यरत असतानाच भारतीय सेनेच्या परीक्षेत आणि मुलाखतीत उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर चेन्नई येथील प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून २१ नोव्हेंबर २०२० रोजी लेफ्टनंट म्हणून भारतीय सैन्यात भरती झाल्या. शालिनी सिंग भादुरिया शालिनी सिंग या मेजर अविनाश भादुरिया यांच्या पत्नी. मध्यम वर्गीय राजपूत घराण्यातील शालिनी यांचा विवाह वयाच्या १८ व्या वर्षी झाला. त्यावेळी त्या महाविद्यालयात पदवीच्या प्रथम वर्षात शिकत होत्या. आतंकवाद्यांच्या कारवाया निपटून काढणाऱ्या राष्ट्रीय रायफल गटासमवेत जम्मू काश्मीरमधील दोडा येथे दहशतवाद्यांशी लढत असताना मेजर अविनाश यांना २८ सप्टेंबर २००१ रोजी वीरमरण आले. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबाराने जखमी झालेल्या अवस्थेतही मेजर अविनाश यांनी चौघांना ठार केले. यामुळे प्रभावित झालेल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी उरलेल्या सर्व दहशतवाद्यांना ठार केले. पतीच्या निधनानंतर शालिनी यांनी महाविद्यालयीन शिक्षण सोडून सैन्यात भरती व्हायचे ठरवले. त्यावेळी दोन वर्षाच्या मुलाची आई असलेल्या शालिनी यांचे वय होते २३ वर्षे. पतीच्या निधनानंतर अवघ्या तीन महिन्यांत परीक्षा, मुलाखती व प्रशिक्षण यांमध्ये शालिनी यशस्वी झाल्या आणि ०७ सप्टेंबर २००२ रोजी त्या लेफ्टनंट म्हणून संरक्षण दलात रूजू झाल्या. राजस्थान, झांशी आणि दिल्ली इथे पाच वर्षांच्या सैन्यातील सेवेनंतर आपल्या मुलाच्या देखभालीसाठी लेफ्टनंट शालिनी यांनी संरक्षण दलातील नोकरी सोडून अपूरे राहिलेले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर एम.बी.ए.चे शिक्षण घेऊन बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी करू लागल्या. २०१७ साली शालिनी यांनी 'मिसेस इंडिया' या स्पर्धेच्या कार्यक्रमात 'क्वीन ऑफ सबस्टन्स' हा पुरस्कार मिळवला. रिया नेहरा रिया नेहरा या लेह येथे तैनात असलेल्या भारतीय सैन्यातील तरुण अभियंता अधिकारी कॅप्टन सोमेश श्रीवास्तव यांच्या पत्नी. ०४ मार्च २००१ रोजी मनाली-लेह सेक्टरमध्ये बर्फ हटवण्याच्या ऑपरेशनमध्ये कॅप्टन सोमेश श्रीवास्तव यांना कर्तव्य बजावताना वीरमरण आले. रिया यांनी अल्पावधीतच आपल्या धाडसी पतीचा वारसा पुढे नेण्यासाठी सैन्यात सामील व्हायचे ठरवले. त्यासाठी आवश्यक त्या परीक्षा, मुलाखती व चेन्नई येथील प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून ०७ सप्टेंबर २००२ रोजी लेफ्टनंट म्हणून त्यांची नियुक्ती झाली. प्रिया सेमवाल प्रिया सेमवाल या भारतीय लष्करातील नाईक अमित शर्मा यांच्या पत्नी. स्वतः फक्त १० वी पर्यंत शिकलेल्या नाईक अमित शर्मा यांनी प्रियाला विवाहानंतर शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहनासह सर्वोतोपरी पाठिंबा दिला. अरूणाचल प्रदेशातील तवांगनजीक नाईक अमित शर्मा दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी 'ऑपरेशन ऑर्किड' या मोहिमेत कार्यरत असताना २० जून २०१२ रोजी शहीद झाले. प्रिया यांच्यासाठी हा फार मोठा आघात होता. प्रिया लवकरच या धक्क्यातून बाहेर आल्या ते त्यांनी लष्करात भरती होण्याच्या निर्णयाने. कुटुंबातील सदस्यांचा विरोध पत्करून त्या आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या. आवश्यक त्या परीक्षा व प्रशिक्षण यामध्ये यशस्वी झाल्यावर १४ मार्च २०१४ रोजी प्रिया सेमवाल यांची भारतीय सैन्यात लेफ्टनंट या पदावर नियुक्ती झाली. भारतीय सेनेतील एका जवानाच्या पत्नीने अधिकारी म्हणून नियुक्त होण्याचे प्रिया सेमवाल हे एकमेव उदाहरण आहे. आज लेफ्टनंट प्रिया सेमवाल यांच्या नावाला 'कॅप्टन' हे पद जोडले गेले आहे. रुची वर्मा रुची वर्मा या मेजर विनीत वर्मा यांच्या पत्नी. आसाम राज्यातील बारीपाडा गावात कट्टरतावाद्यांविरोधातील अभियानात मेजर विनीत वर्मा यांना ३० एप्रिल २०१३ रोजी वीरगती प्राप्त झाली. काही दिवसांतच रूची या दु:खातून सावरल्या आणि त्यांनी भारतीय सैन्यात दाखल होण्याचे ठरवले. त्यांच्या आई- वडिलांनी या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला. रूची यांनी आवश्यक त्या परीक्षा, मुलाखती व प्रशिक्षण यांमध्ये यश मिळविले आणि १४ मार्च २०१४ रोजी त्या लेफ्टनंट म्हणून भारतीय सेना अधिकारी झाल्या. संध्या वधवा संध्या वधवा या नौसेनेतील लेफ्टनंट कमांडर कुंतल वधवा यांच्या पत्नी. संध्या वधवा यांचे वडील नौसेनेत कमांडर होते त्यामुळे सैनिकाची पार्श्वभूमी असलेल्या घरात त्या वाढल्या. संध्या नौसेनेच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी करत होत्या. कमांडर कुंतल वधवा कोलकाता युद्ध नौकेवर अभियांत्रिकी अधिकारी म्हणून कार्यरत होते. ७ मार्च २०१४ रोजी युद्धनौकेवरील यंत्रसामग्री असणाऱ्या विभागाची अग्निशमन क्षमतेची नियोजित चाचणी करत असताना कार्बन डाय ऑक्साईडच्या यंत्रणेत बिघाड झाल्याने त्या वायूची गळती झाली आणि तो वायू कमांडर कुंतल यांच्या शरीरात गेला. त्याचवेळी त्यांच्या डोक्याला दुखापतही झाली आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. संभावित धोक्याची कल्पना असल्याने चाचणीपूर्वी त्यांनी तेथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नौकेवरील त्या जागेवरून दूर जायला लावल्याने मोठी जीवितहानी टळली. पतीच्या निधनानंतर तिसऱ्या दिवशीच संध्या यांनी नौसेनेत भरती होण्याचे ठरवले आणि कोलकाता युद्धनौकेच्या कमांडरना तसे कळवले. ४० वर्षे वयाच्या संध्या यांचा निर्धार पाहून संरक्षण मंत्रालयाने त्यांच्यासाठी वयाची अट शिथिल करून सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाचा अर्ज भरण्याची परवानगी दिली. अर्ज मंजूर झाल्यानंतर बोर्डाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन केरळ राज्यातील एझिमाला येथील भारतीय नौदल अकादमी (आशियातील सर्वांत मोठी आणि जगातील तिसरी सर्वांत मोठी नौदल अकादमी) इथे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या १४ मार्च २०१५ रोजी लेफ्टनंट कमांडर झाल्या. नौदलासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या पुरवठ्याच्या व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यानंतर त्यांना मुंबई येथील हमला या भारतीय नौसेनेच्या नौकेवर विशेष प्रशिक्षण घ्यावे लागले. लेफ्टनंट कमांडर संध्या वधवा यांना २०१५ साली भारताच्या ६६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी संचलनामध्ये लष्कराच्या पहिल्या महिला तुकडीत सहभागी होण्याची संधी मिळाली. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्यासमोर इतर १४४ महिला अधिकाऱ्यांसोबत संध्या यांनी संचलन केले. त्याच वर्षीच्या अखेरीस, लेफ्टनंट कमांडर संध्या वधवा यांनी पती लेफ्टनंट कमांडर कुंतल वधवा यांना त्यांच्या उत्कृष्ट धैर्य, नेतृत्व आणि राष्ट्रसेवेतील सर्वोच्च बलिदानासाठी मरणोत्तर प्रदान करण्यात आलेला 'नौसेना शौर्य पुरस्कार' विराट या नौकेवर झालेल्या समारंभात स्वीकारला. ही केवळ काही उदाहरणे. याव्यतिरिक्त निधी मिश्रा दुबे, नीता देसवाल, सुष्मिता पांडे, नीरू संब्याल, संगीता माल, गरीमा अब्रॉल, निकिता कौल दौंडियाल, ज्योती नैनवाल, कोरोल रिगझिन, हरवीन कौर काहलोन, रेखा सिंग अशा अनेक वीर नारींनी पतीच्या निधनाचे दु:ख बाजूला सारून आज देशसेवेला वाहून घेतले आहे. शहीदांच्या पत्नी म्हणून प्रशिक्षणासाठी व भरतीसाठी या वीर नारींना कोणतीही सूट मिळत नाही. जे नियम इतर उमेदवारांसाठी असतात ते सर्व नियम या स्त्रियांसाठीही लागू असतात. आवश्यक शारीरिक व मानसिक जडण घडण, तत्परतेने निर्णय घेण्याची क्षमता, संघटन कार्य आणि धीरोदात्त वृत्ती यांच्यावर प्रशिक्षणाच्या काळात भर दिला जातो. स्त्रिया प्रतिकूल परिस्थितीशी धैर्याने लढतात आणि आपल्या सामर्थ्याने सर्वांना चकित करतात, हे या महिला सेनानींनी सिद्ध केले आहे. प्रत्येक वीर नारीची पार्श्वभूमी व परिस्थिती वेगळी होती. कोणाचे शिक्षण झालेले होते, कोणाचे अर्धवट झालेले होते. कोणी लहानशा गावात रहात होत्या तर कोणी शहरात. काहींना परीक्षेची तयारी करत असताना अर्थार्जनही करावे लागत होते, काहींना आपल्या मुलांना हॉस्टेलवर ठेवावे लागले, तर काही जणींच्या आई-वडीलांनी किंवा सासू सासऱ्यांनी ती जबाबदारी स्वीकारली. मातृत्वापेक्षा राष्ट्रत्वाला प्राधान्य देऊन या वीर नारींनी आपल्या मुलांना राष्ट्रप्रेमाचे बाळकडू पाजले. आपल्या पतीच्या गणवेशाचा व त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा सन्मान राखला. धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या धीरोदात्त पत्नींची ही आदर्श उदाहरणे सर्व वीरमाता आणि वीरपत्नींचे धैर्य वाढवणारी आणि पुढील पिढीला प्रेरणा देणारी आहेत.

# राज्यात आतापासूनच उन्हाचे चटके आणि पाणी टंचाई,तर पुढे काय!

राज्यासह देशातील वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, वाढते वाहतूकीचे प्रमाण, सिमेंटीकरण,मोठ्या प्रमाणात जंगलतोड यामुळे हवामानात दिवसेंदिवस आमुलाग्र बदल होत आहे.या बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती दिवसेंदिवस आक्राळ-विक्राळ रूप धारण करीत आहे.यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू यांच्यापुढे अत्यंत गंभीर व चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. बदलत्या हवामानामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत आतापासूनच उष्णतेची लाट पहायला मिळत आहे.ही राज्यासाठी व देशासाठी धोक्याचीच घंटा म्हणावी लागेल. यावरून स्पष्ट होते पुढील दिवस अत्यंत गंभीर रूप धारण करू शकतात. कारण आताच नागपूरचा पारा ४१.१ डिग्री सेल्सियसवर येवून पोहोचला आहे तर दुसरीकडे १३ मार्चला ब्रम्हपुरी येथे राज्यातील तसेच देशातील सर्वाधिक पारा ४२ अंश डिग्री सेल्सियस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली.म्हणजेच आतापासून उष्णतामान वाढने पुढील दिवसांसाठी कठीणाई निर्माण करू शकते यालाही नाकारता येत नाही.त्यामुळे बदलते हवामान व वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.हवामान खात्याने हेही सांगितले आहे की पुढे चालून तापमानात कमी होण्याची संभावना नसल्याने स्पष्ट सांगितले आहे.कारण १३ व १४ मार्चला विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांना हीट वे ची चेतावणी देण्यात आलेली होती.म्हणजेच उष्णतेच्या बाबतीत पुढील काळ अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण होळीपुर्वीच गुजरात, महाराष्ट्र आणि राजस्थानमधील अनेक भाग उष्णतेच्या लाटेच्या तडाख्यात आहेत. गुजरात- राजस्थान- महाराष्ट्रातील डझनभराहुन अधिक शहरांमध्ये तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडला आहे. यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत कठीण व बिकट परिस्थिती निर्माण करू शकते याला नाकारता येत नाही. सध्याच्या परिस्थितीत उष्णता वाढल्याने युवा वर्ग नदी, तलाव याठिकाणी मौजमस्ती करण्यासाठी जातात व ज्यांना पोहता येत नाही अशे युवक-युवती नदी किंवा तलावात उतरण्याचा प्रयत्न करतात अशावेळी मोठी दुर्घटना होऊ शकते आणि होत आहे यामुळे परिवारावर व संपूर्ण कुटुंबावर मोठा कठीण प्रसंग निर्माण होतो.त्यामुळे युवकांनी नदी-तलाव यापासून सावधगिरी बाळगुन दुर रहावे कारण कोणतीही दुर्घटना सांगुन येत नाही ती केव्हाही कधीही होऊ शकते.त्यामुळे अशा दुर्घटनांपासुन वेळीच स्वतः ला सावरले पाहिजे. तापमान वाढल्याने आगीच्याही घटनांमध्ये सुध्दा वाढ झाल्याचे दिसून येते. आतापासुन निर्माण झालेले वाढते उष्णतामान हळूहळू पाण्याच्या समस्येकडे वाटचाल करीत आहे आणि याचा फटका थोड्याच दिवसात आपनासर्वांना भोगावा लागु शकतो यालाही नाकारता येत नाही.वाढत्या उष्णतामानामुळे त्वचेचा आजार किंवा अन्य आजाराचा धोका निर्माण होऊ शकतो. याकरीता आतापासूनच वाढते उष्णतामान पहाता स्वतः ची काळजी स्वतःच घेतली पाहिजे.घराच्या बाहेर निघतांना कानाला व डोक्याला दुपट्टा बांधुनच निघावे,पाणी जास्तीत जास्त प्यावे व उष्णतेपासून स्वतःचा जेवढा बचाव करता येईल तेवढा बचाव अवश्य केला पाहिजे.कारण बदलत्या हवामानामुळे यावर्षी उष्णतेचे प्रमाण जास्त रहाण्याची शक्यता हवामान खात्याकडुन वर्तवली जात आहे आणि त्याची सुरुवात वेळेच्या आधी झाल्याने मानव, पशुपक्षी व अन्य जीवजंतू यांना आतापासूनच त्याची झळ सोसावी लागत आहे.त्यामुळे सावधान वाढत्या उष्णतेपासून स्वतः ही सुरक्षित रहा व पशुपक्षांनाही सुरक्षित ठेवा.मार्च महिन्याच्या मध्यातच उन्हाच्या झळा तीव्र होत असल्याने पाण्याच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे.राज्यात दमदार पाऊसामुळे नद्या, तलाव,धरणात आक्टोंबर महिन्यात मुबलक पाणी साठा जमा झाले होते म्हणजेच ८८ टक्के जलसाठा होता.ही मागील पाच वर्षातील मोठी वाढ मानली जात होती.परंतु वाढते उष्णतामान पहाता जलसाठा दिवसेंदिवस कमी कमी होत आहे ही चिंताजनक बाब आहे.मागील पाच महिन्यांत राज्यातील जलसाठ्यात ३५ टक्क्यांनी घट होऊन ५२.७१ टक्यावर आला आहे.सध्याच्या परिस्थितीत जलसाठा कोकण ५७.६३ टक्के, मराठवाडा ५१.११ टक्के, नागपूर ४८.८३ टक्के, अमरावती ५७.३९ टक्के, नाशिक ५२.८९ टक्के, पुणे ५२.२२ टक्के इतका जलसाठा राज्यातील मुख्य धरणांमध्ये शिल्लक आहे.पाण्याची कठीण परिस्थिती पाहता राज्यातील कोकण व पुण्यातील दहा गावांना व ९५ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे यावरून आपण समजू शकतो की पुढील काळ अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण करू शकते.त्यामुळे पाण्याच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.दरम्यान आगामी काळातील वाढते उष्णतामान, पाण्याची मागणी, बाष्पीभवनाचा वेग बघता पाणी टंचाई अत्यंत गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.याकरीता सरकारने ताबडतोब नियोजन करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे वाढते उष्णतामान पहाता सर्वांनीच सावधगिरी बाळगुन आरोग्याची काळजी घ्यावी.

********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# केज येथे महिला व मुलींच्या जागतिक महिला दिनानिमित्त कबड्डी स्पर्धा संपन्न

## कोरो इंडिया एकल महिला संघटनेचा स्तुत्य उपक्रम



केज/प्रतिनिधी जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कुल रोजा मोहल्ला केज येथे मुली व महिलांच्या कबड्डी स्पर्धा एकलमहिला केज तालुका अध्यक्ष वच्छला शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाल्या. उदघाटक म्हणुन केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून वच्छला शिंगारे तर प्रमुख पाहुणे म्हणुन राधा सपकाळ कोरो इंडियाच्या विनया बाबर,अनिता खंडागळे एकल महिला संघटनेच्या समन्वयक महानंदा चव्हाण,रूक्मिनी नागापुरे,केज तालुका सचिव तसलीम इनामदार यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन केले, यावेळी आयोजकाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला व कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कोरो एकल महिला संघटनेच्या वतीने महिला गट आणि मुलीच्या विजेत्या गटाला बक्षिसही जाहीर केलेले होते. यामध्ये महिला गट-प्रथम पारितोषिक ५००० रुपये,द्वितीय पारितोषिक ३००० रुपये,तृतीय पारितोषिक २००० रुपये, मुलींच्या गटासाठी प्रथम पारितोषिक ३००० रुपये,द्वितीय पारितोषिक २००० रुपये,तृतीय पारितोषिक १००० रुपये ठेवण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये ३०० मुली-महिला यांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेमध्ये ३ महिला संघ व ३ मुलीचे संघ एकूण सहा संघ विजयी झाले विजयी संघास उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि पारितोषिक देण्यात आले त्याचबरोबर सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व मिडल देण्यात आले. तालुक्यातील १२ संघ खेळले . विविध शाळेतील मुलींचा उत्सफूर्त सहभाग होता. अशाप्रकारे एकूण सहासंघ विजेते ठरले महिला आणि मुलींनी डान्सकरून जल्लोष केला . कळंब येथील कोच आणि खेळाडू हजर होते . कार्यक्रम यशस्वितेसाठी एकलमहिला संघटनेच्या तारा घोडके,लता बर्डे,मिरा हजारे, उर्मिला गालफाडे,अनिता कांबळे,गावपातळीवरील लिडरमहिला तसेच लक्ष्मण हजारे,रोहिणी खरात अविनाश खरात,कोरो इंडियाचे दिपक निकाळजे टीम,लक्ष्मीवाघमारे ऋशाली,सुषमाताई, भाग्यश्री रणदिवे, प्रजावतीताई मराठवाड्यीतील मान्यवर व कोरो इंडिया एकल महिला संघटनेचे व अंकुर स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

व्यवस्थेच्या चाकोरीला छेद देण्याचे काम केज तालुक्यातील एकल महिला संघटनेने कबड्डी स्पर्धा आयोजीत करून केले. विजेते ठरलेले संघ पहिला क्र. केकतसारणी जिजाऊ संघ, दुसरा क्र.मांगवडगाव क्रांती संघ, तिसरा क्र.जयजिजाऊ संघ, कळंब महिला संघ विजेते ठरले तर मुलींचे संघ प्रथम सोनीजवळा किंगसंघ, दुसरा क्र. केकतसारणी राजमुद्रा संघ, तिसरा क्र.स्वामी विवेकानंद केज

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कौशल्य अंतर्गत तरुण-तरुणींचा रोजगार कायम करावा - माजी मंत्री अमित देशमुख यांची मागणी

मुंबई :- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या राज्यातील तरुण-तरुणींना त्याच ठिकाणी कायम सेवा देण्याचे आश्वासन मागील सरकारने दिले होते मात्र आता त्यांना वाऱ्यावर सोडण्याचे धोरण शासन अवलंबत आहेत, आम्हाला सेवेत कायम करावे या मागणीसाठी सदरील युवक आपल्या कुटुंबासह आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला बसले आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आज विधानसभेत सदरील विषय उपस्थित करून या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधले, या तरुण मंडळींना न्याय देण्याची मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली. महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सोमवारी (१७ मार्च) रोजी माजी मंत्री आणि आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कौशल्य अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या राज्यातील सर्व तरुण-तरुणींचा रोजगार कालावधी ठराविक न ठेवता कायम करण्याची मागणी केली. ही मागणी त्यांनी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशनद्वारे सभागृहात मांडली. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने राज्यातील १ लाख २० हजार सुशिक्षित बेकार तरुण-तरुणींची मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत निवड केली, ऐन निवडणूक काळात शासनाच्या विविध योजनांचा प्रचार आणि प्रसार त्यांच्याकडून करून घेतला, निवडणुकीचा कालावधी संपल्यानंतर सत्ता मिळताच लगेच त्यांना कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. युवा मंडळीने आवाज उठल्यानंतर आता आणखीन ५ महिन्याचा कालावधी त्यांना वाढवून दिला असला तरी निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे आम्हाला कायम सेवेत घ्यावे अशी या युवकांची मागणी आहे, त्यासाठी ते ३ मार्चपासून मुंबई येथे आझाद मैदानावर आपल्या कुटुंबातील मुलाबाळांसह उपोषणाला बसले आहेत, शासनाने या सुशिक्षित बेकरांच्या व्यथा जाणून घ्याव्यात, त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करत आज विधानसभेत शासनाचे या समस्येकडे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लक्ष वेधले. यावेळी या विषयाकडे शासनाने गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे अशी सूचना विधानसभा अध्यक्ष मा. श्री राहुलजी नार्वेकर यांनी केली आहे.




# विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत आणि रामेश्वर ग्रामस्थांतर्फे







लातूर :- विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत पुरातन यज्ञभुमी रुई रामेश्वर ग्रामस्थ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड स्मृती प्रित्यर्थ संत एकनाथ महाराज षष्ठीचे औचित्य साधून लातूर तालुक्यातील रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महा-वीर स्पर्धा २०२५ चे शुक्रवार दि.२१ मार्च २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास १ लाख २५ हजार रूपये रोख, चांदीची गदा, मेडल व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी कुस्ती खेळाडूसह क्रीडा प्रेमींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे. शुक्रवार दि.२१ मार्च २०२५ रोजी रामेश्वर येथे राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड स्मृती राज्यस्तरीय महाराष्ट्र महावीर कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९ वाजता होणार असून पारितोषिक वितरण सायं. ७ वा. होणार आहे. या समारंभास महाराष्ट्राचे युवक व क्रिडामंत्री ना. दत्तात्रय भरणे हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या कार्यक्रमास हिंद केसरी पै. जगदिश कालीरमण, हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग, महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, महाराष्ट्र केसरी पै. रावसाहेब मगर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर रामेश्वर (रुई) चे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड हे प्रमुख मार्गदर्शक आहेत. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे हे १८ वे वर्ष आहे. यासाठी महाराष्ट्रातील नामवंतासह देशभरातील मल्लांना निमंत्रीत केले आहे. राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील सर्वश्रेष्ठ विजेत्या मल्लास महाराष्ट्र कुस्ती महावीर हा अत्यंत बहुमानाचा किताब, रोख १ लाख २५ हजार रूपये, चांदीची गदा व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. द्वितीय क्रमांकास १ लाख रूपये, तृतीय क्रमांकास ५० हजार आणि चतुर्थ क्रमांकास २५ हजार रूपये यासह वजनगट ५७, ६१, ६५, ७०, ७४, ८६ ते १२५ किलो वजन गटातील विजेत्या मल्लांना गटनिहाय हजारो रूपयांची पारितोषिके, सुवर्ण, रौप्य, कास्यं पदक, प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, उपांत्यपूर्व फेरीमध्ये पोहोचलेल्या सर्व कुस्तीगीरांना मानधन देण्यात येईल. थोर स्वातंत्र्यसेनानी, राष्ट्रीय कीर्तनकार, आरोग्य शास्त्रातील एक महान चमत्कार, योग महर्षि शतायुषी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा यांच्या स्मृतिप्रित्यर्थ तंदुरूस्त अशा पंचाहत्तर वर्षे वयाच्या पुढील मल्लांसाठी याच दिवशी एक आगळी वेगळी कुस्तीस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्यांना योग महर्षी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलारमामा स्मृती सुवर्ण, रोप्य, कांस्य गौरव पदक बहाल करण्यात येईल.

सर्व मल्लांची वजने गुरुवार दि. २० मार्च २०२५ रोजी सायं. ४ ते ८ पर्यंत घेतली जातील. सर्व कुस्तीगीरांनी आधारकार्डची मूळ प्रत व त्याची झेरॉक्स प्रत आणणे बंधनकारक आहे. स्पर्धा राज्य संघटनेच्या नियमानुसार घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कोणतीही प्रवेश फी आकारली जाणार नाही. स्पर्धेसाठी येणार्या निवडक कुस्तीगीरांच्या जाण्या येण्याचे एस.टी.भाडे, निवासाची व भोजनाची व्यवस्था संयोजकातर्फे करण्यात येईल. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रा.विलास कथुरे (मो. नं.९८५०२११४०४) व राहूल हरिश्चंद्र बिराजदार (मो. नं.८००७५९३४३४) आणि निखिल वणवे (मो.न. ७२७६३३७६७०) यांच्याशी संपर्क साधावा. या स्पर्धेत जास्तीत जास्त मल्लांनी सहभागी व्हावे. त्याच बरोबर क्रीडाप्रेमींनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

## विश्वररत्न , भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी आ.संजय बनसोडे यांची बिनविरोध निवड



उदगीर :- प्रतिवर्षा प्रमाणे उदगीर शहरात विश्वरत्न, भारतरत्न प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सार्वजनिक जयंती मोठ्या थाटामाठात साजरी करण्यात येते. यावर्षीही महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी व नवीन कार्यकारणीची निवड करणे व मागील वर्षाच्या खर्चाचा आराखडा देण्यासाठी शहरातील नालंदा बुद्ध विहारात माजी नगर सेवक श्रीरंग कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत सर्वानुमते राज्याचे माजी क्रीडा मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांची अध्यक्षपदी एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. या कार्याध्यक्षपदी देविदास कांबळे यांचीही निवड करण्यात आली. या बैठकीस माजी पोलीस निरीक्षक दिलीप कांबळे,शशिकांत बनसोडे, पप्पू गायकवाड, दिलीप सोनकांबळे, माजी नगरसेवक नरसिंग शिंदे, नामदेव बामणे,विठ्ठल कोल्हे, निवृत्ती भाटकुळे , शिवमूर्ती उमर्गेकर, बालाजी गायकवाड, उत्तम गायकवाड, ड. प्रफुल्लकुमर उदगीरकर, सुशीलकुमार शिंदे,गौतम कांबळे, माजी नगरसेवक विलास शिंदे, संघशक्ती बलांडे, सोनू पिंपरे , ड. वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, मनोज माणसे, प्रदीप महापुरे, किरण शिंदे, शत्रुगण गायकवाड, सुधीर घोरपडे, निखिल कांबळे, पप्पू कांबळे, सुधीर बलांडे , बाबासाहेब सुर्यवंशी, अनिल सोमवंशी, शशिकांत तलवारे, उमाकांत बनसोडे, प्रदीप गवळे, कपिल शिंदे,नितीन गायकवाड, नरेश चांदे, सागर सोनकांबळे,राजकुमार माणसे, अजय पारखे , सुदर्शन सांडोळकर, बादशहा कांबळे, ऋषी लांडगे, आकाश कस्तुरे, राहुल कांबळे, विशाल हळ्ळीकर, राम सोनवणे,प्रणव कांबळे,पवन मसुरे, नागेश कांबळे, बबलू सुळकेकर, बबलू मसुरे, महेश कांबळे, आदी भीमसैनिक,समाज बांधव, विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लातूर जिल्हा बँकेकडून अण्णासाहेब पाटील महामंडळा मार्फत पात्र लाभार्थ्यास बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या हस्ते कर्ज वितरण






लातूर :- लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्थापनेपासून नेहमीच शेतकरी सभासदांना वेळेवर कर्ज देऊन आधार देण्याचे काम केले आहे. सध्या कार्यरत संचालक मंडळाने तीच परंपरा कायम ठेवत बँकेचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनात बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी शेतकरी हिताच्या अनेक योजना आखून त्यास मूर्त स्वरूप दिले आहे. या योजनांचा मोठ्या प्रमाणात लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभ होत आहे. कार्यरत संचालक मंडळाच्या प्रगतशील वाटचालीत बँकेतील शेती कर्ज विभागामार्फत विविध प्रकारच्या मध्यम मुदती कर्ज योजनेअंतर्गत मागील साडेतीन वर्षात एकूण ७११ शेतकरी सभासदांना रक्कम रुपये १३७ कोटी कर्ज वितरीत करण्यात आले आहे. शेतकरी हिताचा विचार करत असताना जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख व संचालक मंडळाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून गरजू व पात्र शेतकऱ्यांना मिळत असलेल्या व्याज सवलतीचा लाभ मिळावा याकरिता लातूर ग्रामीण मधील गुंफावाडी येथील शेतकरी सभासद श्री रामानंद वैजनाथ जाधव यांना ट्रॅक्टर व ट्रेलर साठीचे कर्ज रुपये सतरा लाखाचा धनादेश बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, संचालक पृथ्वीराज शिरसाठ, एन. आर. पाटील, जयेश माने, राजकुमार पाटील, अनुप शेळके, संत शिरोमणी कारखाना चेअरमन श्याम भोसले, गणेश ढगे, कार्यकारी संचालक एच जे. जाधव, शेती विभागाचे प्रमुख राजेश मुळे आदींची उपस्थिती होते.

# राज्यातील सहकार चळवळीचे कार्य दिशादर्शक, सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे प्रतिपादन.



लातूर :-- स्व.यशवंतराव चव्हाण यांनी सहकार क्षेत्राची मुहूर्तमेढ रोवत असताना जे विचार अंगिकारले त्याच विचाराला डोळ्यासमोर ठेवून राज्यातील सहकार चळवळीत काम करणाऱ्या संस्था मुळे दिशादर्शक कार्य होत आहे. यामध्ये लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचा देखील मोलाचा वाटा असून भविष्यात सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री तथा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ज्येष्ठ संचालक मा.ना.बाबासाहेब पाटील यांनी केले. राज्याच्या मंत्रिमंडळात सहकार मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने दि. १५ मार्च रोजी सायंकाळी सत्कार करण्यात आला.

तसेच विधिमंडळ काँग्रेस पक्ष मुख्य प्रतोदपदी निवड झाल्या बद्दल माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख यांचा देखील यथोचित सत्कार करण्यात आला. जिल्हा बँकेच्या मुख्यालयात झालेल्या या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून सत्कारमूर्ती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा बँकेचे मार्गदर्शक सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, जिल्हा बँकेचे संचालक अशोकराव पाटील निलंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सत्कार समारंभात सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, चेअरमन धिरज देशमुख, अशोकराव पाटील निलंगेकर यांच्या हस्ते सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

माजी आमदार वैजनाथ शिंदे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, राज्य साखर संघाचे सदस्य आबासाहेब पाटील, रेणाचे संचालक यशवंतराव पाटील, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन श्रीशैल्य उटगे, ट्वेंन्टी वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, काँग्रेसचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष ॲड. किरण जाधव, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन शाम भोसले, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनंत देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सचिन पाटील, लातूर बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, विलास बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव,जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर, पृथ्वीराज सिरसाट,एन.आर पाटील, जयेश माने,लक्ष्मीबाई भोसले,स्वयंप्रभा पाटील,अनिता केंद्रे,राजकुमार पाटील,अनुप शेळके,मारूती पांडे,व्यंकटराव बिराजदार, बँकेचे कार्यकारी संचालक एच. जे. जाधव यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील म्हणाले की, कधी काळी अवसायनात निघालेली लातूर जिल्हा बँक आज मोठ्या दिमाखाने वाटचाल करत आहे. असे सांगून भविष्यात देखील ही गौरवास्पद वाटचाल अधिक जोमाने सुरू राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी बँकेचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख म्हणाले की, सहकार चळवळ रूजवत असताना येथे कधी ही यामध्ये राजकारण आणले नाही.

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

लातूर :– देशातील युवकांना कंपनी, आस्थापने मध्ये अनुभवाची संधी प्राप्त करून देण्यासाठी भारत सरकारने प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेची अर्ज प्रक्रिया सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत २१ ते २४ वर्षे वयोगटातील तरुणांना इंटर्नशिप दिली जाणार आहे. प्रधानमंत्री इंटर्नशिप साठी लातूर जिल्ह्यात एकूण १३ आस्थापनांनी या संकेतस्थळावर रिक्त पदे अधिसुचित केलेली आहेत. या आस्थापनांमध्ये करता येईल इंटर्नशीप... बजाज फायनान्स लि., बायर क्रॉपसायन्सं लि., डाबर इंडिया लि., गोदरेज कंज्युमर कोड लि., एच.डी.एफ.सी. बँक लि., हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., इंड्युसंड बँक लि. , ज्युब्लीयंट फूडवर्कस लि., राष्ट्रीय केमिकल्स न्ड फर्टिलायझर लि., रिलायंन्स इंडस्ट्रीज लि., श्रीराम फायनान्स लि., टाटा ए.आय.जी. जनरल इंन्शुरंन्स कंपनी लि. या नामांकीत कंपनी, आस्थापना यांनी या संकेतस्थळावर रिक्त पदे अधिसूचित केलेली आहेत. यासाठी उमेदवाराचे वय २१ ते २४ पर्यंत असावे व दहावी, बारावी, पदवीधर, आय.टी. आय. या शैक्षणिक पात्रताधारक उमेदवार अर्ज करू शकतात.

असा करा अर्ज ...

या योजनेसाठी अर्ज करु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या संकेतस्थळावर नोंदणी करून प्रोफाईल तयार करावी. त्यानंतर विविध क्षेत्रातील इंटर्नशिपसाठी अर्ज करावा. या योजनेंतर्गत युवकांना १२ महिन्यांसाठी इंटर्नशिपचा लाभ घेता येईल, तसेच या सोबतच त्यांना दरमहा ५ हजार रुपये इंटर्नशिप रक्कम मिळेल, या शिवाय इंटर्नशिप पूर्ण झाल्यानंतर ६ हजार रुपये एकरकमी अनुदान मिळेल. या योजनेंतर्गत भारत सरकारकडून प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विमा संरक्षण प्रदान केले जाईल. या योजनेचा लातूर जिल्हयातील दहावी, बारावी, पदवीधर, आय.टी.आय. या शैक्षणिक पात्रतेचे जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी या कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२३८२–२९९४६२ वर संपर्क साधावा, असे त्यांनी म्हटले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त ठाकरे सेनेचे विविध कार्यक्रम







लातूर – शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक लातूर येथे पक्षाच्या वतीने अभिषेक व पुजन जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसपर्कप्रमुख नामदेव चाळक यांच्या हस्ते संपन्न झाले यानंतर मोफत खिचडी वाटप करण्यात आली. जयंती निमित्त पक्षाच्या वतीने छावा चित्रपट मोफत दाखवण्यात आला या चित्रपटाचा शुभारंभ जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक सौ जयश्रीताई उटगे, सुनीता चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, विष्णू साठे, रमेश माळी, राहूल रोडे, अविनाश रेशमे, शंकर रांजणकर, आबासाहेब पवार, शिवाजी चव्हाण, मुकेश सुडे, संजय उजळबे, किशोर जाधव, शेखर चव्हाण, बसवराज मंगरूळे, अण्णासाहेब मिरगाळे आदी सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले यांना डॉक्टरेट



चाकूर / प्रतिनिधी :– येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा.शिवाजीराव बळीराम नवरखेले यांना अमेरिकेच्या वॉशिंग्टन डिजिटल विद्यापीठाने नुकतीच दिल्ली येथे १ मार्च रोजी एका कार्यक्रमात मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित केले. यावेळी प्रा. शिवाजीराव नवरखेले यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची दाखल घेवून वॉशिंग्टन डिजिटल विद्यापीठाचे मानद शैक्षणिक सल्लागार डॉ रणदिमा पथैरगे, डॉ मुरईल रोबर्ट, बसेम हेलिस, लुईस ओबेन्ग यांनी त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. माजी प्राचार्य शिवाजीराव नवरखेले कुशल प्रशासक आणि इंग्रजी विषयाचे तज्ञ म्हणून ओळखले जातात. त्यांचे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान राहिलेले आहे. इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणूनही त्यानी प्रदीर्घ सेवा बजावली आहे. लातूर जिल्हा साक्षरता मोहीम चाकूर तालूक्यामध्ये प्रभावीपणे राबवून विवेक वाहिनीच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य त्यांनी केले आहे. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोण रुजविण्यासाठी प्रयत्न केले असून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे काम केले आहे. कला क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर राहून महाविद्यालयाला उंच शिखरावर घेवून एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून अमेरिकेतील वॉशिंग्टन डिजिटल विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली आहे. या कार्यक्रमाला भारतातील विविध विद्यापीठाचे नामवंत तज्ञ मंडळी उपस्थित होती. सध्या त्यांचे, गाव सोडून जाताना हे आत्मचरित्र आणि प्रभावी प्रशासन असे दोन पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल माजी प्राचार्य नवरखेले यांचे सर्वस्तरारून अभिनंदन होत आहे.

# कुणकी येथील जयंती मंडळाच्या अध्यक्षपदी विठ्ठल वाघमारे



जळकोट :– जळकोट तालुक्यातील कुणकी येथे आयोजित करण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीची पूर्वतयारी करण्यासाठी नुकतीच बैठक संपन्न झाली.या बैठकीत एप्रील २०२५ मध्ये संपन्न होणा–या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची कार्यकारिणी करण्यात आली.या कार्यकारिणीचे अध्यक्ष म्हणून विठ्ठल तुकाराम वाघमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे निवडण्यात आली. उपाध्यक्ष– प्रताप वाघमारे आणि रामा वाघमारे, सचिव– बालाजी वाघमारे, कोषाध्यक्ष– चक्रपाल वाघमारे, सहकोषाध्यक्ष– रामदास बंडे, सदस्य धोंडुतात्या वाघमारे, तानाजी वाघमारे,किशोर वाघमारे,साहेबराव वाघमारे तर सल्लागार म्हणून गौतम वाघमारे,दशरथ वाघमारे,ड.उध्दव वाघमारे, डॉ. लहू वाघमारे,बालाजी दिगंबर वाघमारे यांची सल्लागार समिती नियुक्त करण्यात आहे.या समितीच्या वतीने जयंतीनिमित्त विविध नाविन्यपूर्ण उपक्रम साजरे करण्याचे या बैठकीत ठरले. या सर्व पदाधिकाऱ्यांचे व त्यांनी आयोजित केलेल्या विविध उपक्रमांचे परिसरातील सर्व आंबेडकरी जनतेच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.

# हवामान अंदाजानुसार वातावरणात बदल,तर प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी



किनवट: शेख शौकत :–किनवट तालुक्यात अचानक तापमानात वाढ झाल्याने पालकांना लहान मुलांची काळजी वाटते अशी चर्चा बाजारामध्ये नागरिकाकडून ऐकायला मिळत आहे.परिणामी डोंगरदऱ्यात असलेल्या किनवट भागात वातावरण उष्ण राहण्याचा अंदाज वर्तविला आहे. प्रादेशिक मौसम विभाग मुबंई यांच्या हवामान अंदाजानुसार वातावरणात बदल झाला आहे. या करीता उन्हाळ्यात सुरक्षेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून काही मार्गदर्शक सूचना प्रशासनाच्या वतीने निर्गमित केल्या आहेत. तहान लागलेली नसली तरीही जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. बाहेर जाताना छत्री, टोपी, चष्मा,बुट व चपलाचा वापर करण्यात यावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत घ्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापरतत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेशे पिण्याचे पाणी द्यावे. थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना काळजी घेण्याबाबत सूचित करण्यात यावे. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी, असे करणे योग्य असल्याचे सांगण्यात आले आहे. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. दुपारी १२ ते ३ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे व बाहेर काम करणे टाळावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आणखीन पाच सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून तडीपार . पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई.



लातूर :– आणखीन पाच सराईत गुन्हेगार लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार). पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची कारवाई.

याबाबत याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे विवेकानंद चौक, व उदगीर शहरातील तसेच लातूर जिल्ह्यात विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत टोळी तयार करून वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या पाच सराईत गुन्हेगारांविरुद्ध एक वर्षा करिता हद्दपारीची (तडीपार) कारवाई करण्यात आली आहे.

हद्दपारची कारवाई करण्यात आलेल्याचे नावे

अक्षय उर्फ आकाश राम तेलंगे, वय २१ वर्ष, राहणार गोपाळ नगर लातूर,

साहिल महबूब सय्यद, राहणार संजय नगर लातूर,

बालाजी रामराव डोंगरे, वय ५८ वर्ष, राहणार इंदिरानगर उदगीर,

किशोर कोंडीबा धनवाले, वय ४० वर्ष, राहणार गणेश नगर उदगीर,

कृष्णा प्रल्हाद गाडेकर, वय ३० वर्ष, राहणार सोमनाथपूर उदगीर.

असे असून नमूद आरोपींतावर पोलीस ठाणे विवेकानंद चौक, उदगीर शहर व लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये समाजविघातक कारवाया करणे, परिसरातील रहिवासी लोकांच्या मालमत्तेला इजा पोहोचून भय निर्माण करणे, प्राणघातक शस्त्र वापरून दहशत निर्माण करणे, आजन्म कारावास किंवा अन्य करावासाचे शिक्षेस पात्र असलेले गुन्हे करणे, शांतता भंग करणे, यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्यामुळे सामाजिक शांतता धोक्यात आली होती.

लातूर जिल्ह्यात शांतता अबाधित राहावी. नमूद सराईत गुन्हेगारांकडून कोणत्याही प्रकारचे गैरकायदेशीर कृत्य घडू नये, याकरिता लातूर शहरात वारंवार मालमत्ता विषयी व शरीराविषयी गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून सामाजिक शांतता करणाऱ्या गुन्हेगाराना ०१ वर्षासाठी लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात आले असून नमूद गुन्हेगारांना लातूर जिल्ह्याच्या हद्दीच्या बाहेर सोडण्यात येत आहे.

नमूद आरोपी विरुद्ध उपविभागीय पोलीस अधिकारी, (लातूर शहर) रणजीत सावंत, तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी (उदगीर) सोहेल शेख, पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील, पोलीस ठाणे उदगीर शहर चे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, पोलीस अमलदार प्रदीप स्वामी, पोलीस ठाणे विवेकानंद चौक व उदगीर शहर चे पोलीस अंमलदार खुर्रम काझी, रवी गोंदकर, गणेश यादव, रणवीर देशमुख, यशपाल कांबळे, बबन टारपे , गजानन पुल्लेवाड, दीपक कच्छवे, संदीप साठे, रवी शेळके यांनी सविस्तर हद्दपार प्रस्ताव तयार करून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्याकडे पाठविले होते. त्यावर पोलीस अधीक्षकांनी सदर प्रस्तावांचे अवलोकन करून नमूद आरोपीमुळे सामाजिक शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ प्रमाणे कार्यवाही करून सदर सराईत गुन्हेगारांना लातूर जिल्ह्यातून हद्दपार (तडीपार) करण्यात केले आहे.

गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत गुन्हेगार, उपद्रवी लोकांवर जरब बसवण्यासाठी या आधी अनेक गुन्हेगाराना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. तसेच आणखीन सराईत गुन्हेगारांचे तडीपाराचे प्रस्तावावर कार्यवाही सुरू असून पुढील काही दिवसातच आणखीन सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात येणार आहे.

# डॉ.आंबेडकरांनी मताधिकाराची शक्ती दिली तर कांशिरामजींनी ती शक्ती वापरून सत्ता घेतली.



लातूर :–– ब्रिटीश काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांसाठी सर्वप्रथम मताधिकाराची मागणी केली आणि ती त्यांनी पूर्णत्वास नेली. त्यांच्या संविधानाने तर सर्व भारतीयांना मतदानाचा मूलभूत अधिकार देऊन राजकीय समता प्रस्थापित केली. त्या मताधिकाराच्या जोरावर त्यांचे वारसदार मान्य. कांशिराम साहेब यांनी देशातील सर्वात मोठ्या राज्याच्या मुख्यमंत्रीपदी दलित महिलेला विराजमान केले.तब्बल चार वेळा दलित महिला मुख्यमंत्री झाली .केवळ आंबेडकरी विचाराच्या निष्ठेमुळे हे शक्य झाले. असे प्रतिपादन मान्य. कां शिराम साहेबांचे सहकारी आणि बहुजनांचे नेते प्रा.सुरेश माने यांनी केले आहे.

लातूर येथील भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात ' ॠ– २४. ' च्या वतीने मान्य .कांशिराम साहेब यांच्या ९१ व्या जयंती निमीत्त आयोजित केलेल्या दोन दिवसीय 'बहुजन समाज प्रबोधन शिबीर ' चा समारोप करताना प्रा.डॉ. सुरेश माने बोलत होते. अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध राजकीय विश्लेशक प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे होते.

या शिबीरातील शेवटच्या सत्रात भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप : बहुजनांच्या वैकल्पीक राजकारणाची आवश्यकता ? या विषयावरील अभ्यासपूर्ण भाषणात प्रा.माने पुढे म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी स्वाभिमानी आणि स्वावलंबी राजकारण केले. सत्तेसाठी त्यांनी विचाराशी तडजोड केली नाही. कारण सत्ता बहुजनांच्या उद्धारासाठी त्यांना वापरायची होती. त्यांनी मंत्रीपदाला सोडचिठ्ठी दिली पण तत्वाला सोडले नाही. हाच वारसा मान्य. कांशिराम साहेबांनी चालवला. त्याच दिशेने आज बहुजन समाजाची राजकीय वाटचाल असली पाहिजे.परावलंबी राजकारण या देशातील बहुजनांना न्याय देऊ शकणार नाही. हेही त्यांनी लक्षात ठेवावे. असेही त्यांनी निक्षून सांगीतले.




यावेळी प्रा.डॉ. निशीकांत वारभूवन,स्नेहवर्धन कोल्हापूरे, प्राचार्य आर.डी. निटूरकर यांचीही समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.बी.जी. गाडेकर यांनी केले. राजकुमार नामवाड यांनी सूत्रसंचलन केले तर नरसिंग घोडके यांनी आभार मानले. दोन दिवस चाललेल्या या शिबीरात लातूर शहर आणि जिल्ह्यातील बुध्दी जीवी, कार्यकर्ते, युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# केज शहराच्या मुख्य महामार्गावर वाहनांची कोंडी ;बाह्य बाजू रस्त्याची गरज-डॉ.हनुमंत सौदागर

केज/प्रतिनिधी केज शहराच्या मध्यवर्ती भागातून खामगाव पंढरपूर व अहमदपूर अहिल्यानगर हे महामार्ग जातात. इतरत्र बाजारपेठ नसल्यामुळे शासकीय रुग्णालय, भवानी चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिक्षक कॉलनी या भागात मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला सतत गर्दी झालेली असते. वाहनांची कोंडी होते.शहरात अपघात झाले आहेत.यामुळे यापूर्वी अनेकांना जीव गमावा लागला आहे. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांसाठी बाह्य बाजू रस्त्याची आवश्यकता आहे. बाह्य रस्ता तयार झाल्यास वाहनांची कोंडी होणार नाही. रहदारीचा प्रश्न सुटेल.अपघातात जाणारे जीव वाचतील. तात्काळ बायपास तयार करावा अशी मागणी केली जात आहे. यादोन्हीमुख्य महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत वाढत आहे.

> **लोकप्रतिनिधींचा पुढाकार**
> हवा खा.रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, आमदार नमिता मुंदडा, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांनी पुढाकार घेऊन नेहमी वाहतुकीची कोंडी होत असलेला प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.

हे दोन्ही मार्ग शहरात नेहमीच गर्दीने वाहनांची कोंडी झालेले असतात. पादचाऱ्यांना वाहनाने धडकून अनेक वेळा अपघात झाले आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अधिकचा वेळही लागतो आणि जीवित हानी होत आहे. बाह्य वळण रस्ता तयार झाल्यास कमी वेळेत अधिकचा प्रवास करणे प्रवाशांना शक्य होईल. नेहमी रस्ते जाम होण्याची समस्या सुटणे शक्य होईल .

व्यवसायिकांची मागणी

शहरातील शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी यांना या गर्दीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. केज तालुक्याची मुख्य बाजारपेठ आहे. ग्रामीण भागातून शेतकरी कामगार नोकरदार व्यावसायिक यांची शहरात नेहमीच गर्दी असते. पंचायत समिती, तहसील कार्यालय, शासकीय रुग्णालय, पोलीस स्टेशन,न्यायालय अशी प्रशासकीय कार्यालये असल्याने त्या कामाने निमित्त येणाऱ्या वाहनधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनाही त्रास सहन करावा लागतो. व्यवसायिकांना तासनतास ताटकळत व्यवसाय बंद ठेवावे लागतात. मुख्य महामार्गावरची वाहतूक बाह्य मार्गाने वळवावी अशी मागणी केली जात आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE